४४१ रुग्णांना सुटी : २,५२२ रुग्णांवर उपचार सुरू, एकूण रुग्णसंख्या ३५,६३४ वर

जिल्ह्यात १९२ रुग्णांची वाढ, ५ मृत्यू

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : जिल्ह्यात १७ दिवसांनंतर मंगळवारी रुग्णसंख्येत काहीशी पुन्हा वाढ झाली. दिवसभरात १९२ नव्या पॉझिटिव्ह रुग्णांची भर पडली, तर ४४१ रुग्णांना सुटी देण्यात आली. तसेच इतर जिल्ह्यातील एक आणि औरंगाबादेतील ४ रुग्णांचा मृत्यू झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

जिल्ह्यात एकूण कोरोनाबाधित रुग्णांची संख्या ३५,६३४ झाली आहे. यापैकी आतापर्यंत ३२,१०६ रुग्ण बरे झाले आहेत. तर जिल्ह्यात आतापर्यंत एकूण १,००६ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. जिल्ह्यात आजघडीला २,५२२ रुग्णांवर उपचार सुरू आहेत. जिल्ह्यात मनपा हद्दीतील ३३१ आणि ग्रामीण भागातील १०० अशा ४४१ रुग्णांना सुटी देण्यात आली. नव्या १९२ रुग्णांत ग्रामीण भागातील ७८, नपा हद्दीतील ६३ आणि अन्य ५१ रुग्णांचा समावेश आहे. यात अँटिजन टेस्टद्वारे केलेल्या तपासणीत मोबाईल स्वॅब कलेक्शन पथकास ५१ आणि ग्रामीण भागात २१ रुग्ण आढळले आहेत.

जाधववाडीतील ६५ वर्षीय पुरुष, टाकळी पैठण येथील ८० वर्षीय स्त्री, संत ज्ञानेश्वरनगरातील ७३ वर्षीय पुरुष, विजयश्री कॉलनीतील ८२ वर्षीय पुरुष आणि बीड जिल्ह्यातील ६५ वर्षीय पुरुष कोरोनाबाधिताचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

मनपा हद्दीतील रुग्ण

एनआरएच हॉस्टेल परिसर १, सिटीचौक १, हनुमान टेकडी परिसर १, संजयनगर, मुकुंदवाडी १, पैठण गेट १, एन-नऊ, श्रीकृष्णनगर १, कांचनवाडी ३, जटवाडा रोड, हर्सूल १, भगतसिंगनगर १, एन-अकरा, सुदर्शननगर १, एन-नऊ सिडको २, मयूर टेरेस, गारखेडा परिसर १, प्रकाशनगर १, लॉयन कॉलनी, चिकलठाणा १, उत्तरानगर १, एन-५ सिडको १, चेतनानगर २, भाग्यनगर १, भीमनगर, भावसिंगपुरा १, अन्य २, गुरुदत्तनगर, गारखेडा परिसर १, जाधववाडी १, समाधान कॉलनी १, एन-२ कामगार चौकाजवळ १, पुंडलिकनगर १, अभिनंदन कॉलनी, ईटखेडा १, विष्णूनगर, जवाहर कॉलनी १, अशोकनगर १, जाधववाडी १, नागेश्वरवाडी २, शिवाजीनगर १, दिवाण देवडी परिसर १, एसबीएच कॉलनी, शहानूरमियाँ दर्गा १, श्री कॉलनी, पदमपुरा १, उस्मानपुरा १, सुराणानगर १, औरंगपुरा १, एन-४ सिडको १, नारळीबाग १, इंद्रप्रस्थ सो., गारखेडा २, नायगाव, हर्सूल १, पिसादेवी रोड १, कासलीवाल पूर्वा सो., चिकलठाणा १, संजयनगर, बायजीपुरा १, तारांगण, कासलीवाल, मिटमिटा २, निराला बाजार १, आरेफ कॉलनी १, गारखेडा परिसर १, इंद्रायणी कॉलनी २, जयभवानीनगर १, न्यायालय सो., सिडको १, सईदा कॉलनी, हर्सूल १, समर्थनगर १, गणेशनगर १.

ग्रामीण भागातील रुग्ण

वीरगाव, वैजापूर १, कन्नड १, सिल्लोड १, खुपटा, सिल्लोड १, मुंडवाडी, कन्नड २, मोरे चौक, बजाजनगर २, सुवर्णपुष्प सो., बजाजनगर १, गिरीराज सो., पंढरपूर १, ऋतू रेसिडन्सी, सिडको महानगर १, शिवकृपा सो., बजाजनगर १, सारा कीर्ती, बजाजनगर १, राजा हरिश्चंद्र सो., बजाजनगर १, प्रताप चौक, बजाजनगर १, हिदायतनगर, वाळूज १, वाकळा, वैजापूर ४, चिकटगाव, वैजापूर २, हिलालपूर, वैजापूर १, पिंपळगाव, वैजापूर १, बाभूळगाव ३, पालोद, सिल्लोड १, चंद्रलोकनगरी, कन्नड १, भोलेश्वर कॉलनी, कन्नड २, बाजारपेठ, कन्नड ४, करमाड ३, दुधड १, माऊली हॉस्पिटल परिसर, पैठण १, अन्नपूर्णानगर, पैठण १, परदेशीपुरा, पैठण १, नारळा, पैठण १, जामगाव, गंगापूर ३, अंबेलोहळ, गंगापूर १, रांजणगाव, गंगापूर १, दहेगाव, वैजापूर २, हमरापूर, वैजापूर १, स्वामी समर्थनगर, वैजापूर १, भगूर, वैजापूर १, अन्य १, बालाजीनगर, बिडकीन १, चित्तेगाव १, सिल्लोड ६, औरंगाबाद १०, गंगापूर १, कन्नड १ वैजापूर ३, पैठण १.

एनडीए परीक्षेत डिफेन्स करिअर अकॅडमीचे यश

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : सप्टेंबर महिन्यात घेण्यात आलेल्या एनडीए (यूपीएससी) परीक्षेत डीसीए अर्थात डिफेन्स करिअर अकॅडमीच्या ११ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये कॅडेट्स तन्मय योगेश देशमुख, रोहित जानराव रोठे, अभिजित हनुमंत पाटील, मयूरेश दीपक पाटील, विक्रम लक्ष्मण माळी, संकल्प देविदास चौधरी, चिंतामण विष्णू बुरसे, हितेश अभिजित डोंगे, ऋग्वेद नितीन खरातकर, लहू विठ्ठल पाटील, अभिषेक दिलीप गाढे यांचा समावेश आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे डीसीएचे संचालक केदार राहाणे, सचिव सचिन राहाणे, कमांडंट ले. कर्नल पवनकुमार, प्राचार्य डॉ. आदिनाथ वाकळे, सुभेदार उद्धव टकले, प्राचार्या श्रीलता नायर, रामेश्वर राहाणे, संजय काळोखे, दत्तात्रय शेजवळ यांनी अभिनंदन केले आहे.

एनडीएमध्ये डीसीएच्या विद्यार्थ्यांची निवड व्हावी, यासाठी प्रयत्न करणार ,असे केदार राहाणे यांनी सांगितले.

अभिषेक गाढे

तन्मय देशमुख

हितेश डोंगे

रोहित रोठे

मयुरेश पाटील

अभिजित पाटील

डॉक्टरांच्या संपाने रुग्णसेवेला फटका

२०० आंतरवासिता डॉक्टर संपावर : निवासी, वरिष्ठ डॉक्टरांनी सांभाळली रुग्णसेवेची धुरा

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : कोविड भत्ता देण्याच्या मागणीसाठी मंगळवारी घाटीतील २०० आंतरवासिताा डॉक्टरांनी (इंटर्न) संप पुकारला. परिणामी, रुग्णसेवेला फटका बसला. आंतरवासिता डॉक्टरांअभावी निवासी डॉक्टर, वरिष्ठ डॉक्टरांना वाढीव रुग्णसेवेची धुरा सांभाळावी लागली.

घाटीतील मेडिसिन विभाग, सुपर स्पेशालिटी ब्लॉक आणि इतर विभागांत कार्यरत असतात. कोरोना रुग्णांच्या वॉर्डाबाहेर डिस्चार्ज कार्ड भरण्यापासून तर रुग्णांच्या नातेवाईकांचे समुपदेशन, त्यांना रुग्णांविषयी माहिती देण्यापर्यंतची जबाबदारी आंतरवासिता डॉक्टर पार पाडतात. राज्यभरातील विविध शहरांत आंतरवासिता डॉक्टरांना कोविड भत्ता दिला जात आहे.

परंतु घाटीत कार्यरत या डॉक्टरांना गेल्या ५ महिन्यांपासून या भत्त्याची प्रतीक्षाच करावी लागत आहे. घाटी प्रशासन, जिल्हा प्रशासन, लोकप्रतिनिधी यांच्यासोबत वारंवार चर्चा करूनही मागणी मान्य होत नसल्याने आंतरवासिता डॉक्टरांनी मंगळवारी संप पुकारला.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या परिसरात एकत्र येत डॉक्टरांनी जोरदार घोषणा दिल्या. 'मुंबई, पुणे ५० हजार', 'हक्क मागतोय, भीक नाही', 'वाढीव पगार मिळालाच पाहिजे', अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. डॉक्टरांच्या शिष्टमंडळाने अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर यांची भेट घेतली. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल, असे डॉ. येळीकर यांनी सांगितले.

घाटीत आंतरवासिता डॉक्टरांनी कोविड भत्त्याच्या मागणीसाठी मंगळवारी महाविद्यालय परिसरात एकत्र येत जोरदार घोषणा दिल्या.

११ हजार रुपयांच्या मानधनावर काम

घाटीतील आंतरवासिता डॉक्टर ११ हजार रुपयांच्या मानधनावर काम करीत आहेत. निवासी डॉक्टर, वैद्यकीय अधिकाऱ्यांना कोविड भत्ता मिळत आहे; परंतु आंतरवासिता डॉक्टरांना हा भत्ता देण्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. भत्ता मिळाला नाही तर कोविड वॉर्डात रुग्णसेवा दिली जाणार नाही, असा इशारा या डॉक्टरांनी दिला आहे.

इंडिगोचे २५ पासून मुंबईसाठी रोज विमान

औरंगाबाद : इंडिगोकडून उद्यापासून (दि.१५) आठवड्यातील ४ दिवसांसाठी मुंबई-औरंगाबाद-मुंबई विमानसेवा सुरू करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. त्यापाठोपाठ आता २५ ऑक्टोबरपासून मुंबईसाठी दररोज उड्डाण करण्याचा निर्णय इंडिगोने घेतला आहे.

एअर इंडियाने मुंबईसाठी २२ सप्टेंबरपासून विमानसेवा सुरू केली. यापाठोपाठ इंडिगोने १५ ऑक्टोबरपासून मंगळवार, गुरुवार, शनिवारी आणि रविवारी मुंबईसाठी विमानसेवा सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानंतर आता इंडिगोकडून २५ ऑक्टोबरपासून मुंबईसाठी दररोज विमानसेवा सुरू करण्याचा निर्णय घेतल्याचे उद्योजक सुनीत कोठारी यांनी सांगितले. मुंबईहून सकाळी १०.३५ वाजता उड्डाण घेऊन ११.३५ वाजता इंडिगोचे विमान औरंगाबादेत दाखल होईल. त्यानंतर दुपारी १२.१० वाजता औरंगाबादहून उड्डाण घेईल आणि दुपारी १.१० वाजता हे विमान मुंबईत पोहोचेल.

स्वाक्षरी मोहिमेची सुरुवात करताना शेतकरी गणपत गाडेकर. सोबत डॉ. कल्याण काळे, अप्पासाहेब गावंडे, किरण पाटील डोणगावकर, संदीप बोरसे, भाऊसाहेब जगताप, शेख रज्जाक, मुदस्सर पटेल, संजय प्रधान.

शेतकरी विधेयकांविरोधात स्वाक्षरी मोहीम

फुलंब्री : केंद्र सरकारने मंजूर केलेल्या शेतकरी व कामगार कायद्याविरोधात काँग्रेस पक्षाने स्वाक्षरी मोहीम सुरू केली असून, याचा शुभारंभ सोमवारी फुलंब्री येथून करण्यात आला. जिल्हाभरातून दहा लाख शेतकरी व कामगारांच्या स्वाक्षऱ्या घेतल्या जाणार असल्याची माहिती यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ. कल्याण काळे यांनी दिली.

फुलंब्री तालुका काँग्रेस पक्षाच्या वतीने सोमवारी कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यात केंद्र सरकारविरोधात स्वाक्षरी मोहीम सुरू केली. पक्षाच्या वतीने शेतकरी व कामगारांच्या स्वाक्षरीचे अर्ज राष्ट्रपतींकडे पाठविले जाणार असल्याचे काळे यांनी सांगितले. यावेळी जिल्हा सरचिटणीस किरण पाटील डोणगावकर, वसंतराव नलावडे, अप्पासाहेब गावंडे, आबेद जहागीरदार, भाऊसाहेब जगताप, राहुल सावंत, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष संदीप बोरसे आदी उपस्थित होते.

दोन्ही खुब्यांच्या सांध्यांचे एकाच वेळी प्रत्यारोपण झालेल्या रुग्णासह एमजीएम रुग्णालयाचे डॉक्टर.

शस्त्रक्रियेच्या दुसऱ्या दिवशी शेतकरी युवक पायावर उभा

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : दोन्ही खुब्यांच्या (हिप) सांध्यांच्या एकाच वेळी प्रत्यारोपणाची क्लिष्ट शस्त्रक्रिया एमजीएम रुग्णालयात नुकतीच पार पडली. शस्त्रक्रियेच्या दुसऱ्याच दिवशी २८ वर्षीय शेतकरी युवक पायावर उभा राहिला, अशी माहिती डॉ. गिरीश गाडेकर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

खुब्याच्या दोन्हीही सांध्यांचे यशस्वी प्रत्यारोपण करण्याची ही मराठवाड्यातील पहिलीच वेळ आहे. डॉ. गिरीश गाडेकर, डॉ. गजानन काथार, डॉ. अभिषेक कुलकर्णी, डॉ. कैवाण रंदेरिया आणि डॉ. मोनिका वर्मा यांच्या चमूने ही शस्त्रक्रिया केली. भूलतज्ज्ञ विभागातील डॉ. वासंती केळकर, उमा राईकर आणि शंकर भारती यांनी सहकार्य केले.

डॉ. गिरीश गाडेकर म्हणाले, जालना जिल्ह्यातील दत्ता सावंत या रुग्णाला संधिवात आणि खुब्यासंबंधित प्रचंड त्रास होता. मागील दोन वर्षांपासून त्याला नीट उभे राहता येत नव्हते किंवा चालताही येत नव्हते. शस्त्रक्रियेनंतर त्याला कोणत्याही आधाराशिवाय सामान्यपणे चालता फिरता येत आहे. रुग्णाला मंगळवारी सुटी देण्यात आली.

दोनदा शस्त्रक्रिया करणे टळले

सामान्यपणे एका सांध्याची आधी आणि ३ ते ६ महिन्यांच्या कालावधीनंतर दुसऱ्या सांध्याची शस्त्रक्रिया करता येते. मात्र, दत्ता सावंत यांच्याबाबतीत अशा प्रकारे दोनदा शस्त्रक्रिया करणे सोईचे नव्हते. कारण, एका सांध्याचे प्रत्यारोपण होऊनही त्याला उभे राहता आले नसते. त्यामुळे एमजीएमच्या डॉक्टरांनी दोन्ही सांध्यांचे एकाच वेळी प्रत्यारोपण करण्याचा निर्णय घेतला आणि त्यात ते यशस्वीही ठरले.

एटीएम सेंटरमध्ये सापडलेले ९ हजार पोलिसांकडे केले जमा

औरंगाबाद : एसबीओ शाळेजवळील एटीएम सेंटरमध्ये सापडलेले ९ हजार रुपये पोलीस ठाण्यात आणून जमा करणाऱ्या मनपा कर्मचाऱ्याचा पोलिसांनी सत्कार केला. अमर देवजी फुले, असे या कर्मचाऱ्याचे नाव आहे. मंगळवारी सकाळी एटीएम सेंटरमध्ये त्यांना पैसे सापडले. त्यांनी माजी नगरसेवक किशोर नागरे यांना सांगितले. त्यानंतर ही रक्कम सिडको ठाण्यात जमा केली. पो.नि. अशोक गिरी यांनी त्यांचा सत्कार केला.

दहा हजार शेतकऱ्यांना बियाणांचे मोफत वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क



औरंगाबाद : कोविड - १९ च्या पार्श्वभूमीवर सर्व जग स्तब्ध झालेले असताना केवळ शेतकरी शेतात राबत होते. मात्र, पैसे नसल्याने खरीप हंगामासाठी पेरणी कशी करावी, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला होता. ही बाब कळल्यानंतर भाजपचे राज्यसभा सदस्य डॉ. भागवत कराड यांनी पुढाकार घेत स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून औरंगाबाद जिल्ह्यातील तब्बल दहा हजार शेतकऱ्यांना मका, कपाशी आणि बाजरी या पिकांचे बियाणे मोफत वाटप केले.

मार्च महिन्यापासून कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी संपूर्ण देशभरात लॉकडाऊन करण्यात आले. अचानक आलेल्या या संकटामुळे असंख्य स्थलांतरित मजुरांचे हाल झाले. या कामगार, मजुरांची व्यथा समजून घेत त्यांना मूळ गावी पोहोचविण्याची व्यवस्था केली. याचबरोबर महामारीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था सक्षमपणे काम करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासह घाटी रुग्णालय प्रशासन, इंडियन मेडिकल असोसिएशन, डेंटल असोसिएशन यांच्या माध्यमातून कोरोनाशी लढा देण्याची व्यूहरचना आखण्यात आली. डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांना मास्क, अर्सेनिक गोळ्यांचे वाटप केले. अनेक कोरोना तपासणी केंद्रांना भेटी दिल्या. तसेच लॉकडाऊन काळात सर्वकाही बंद असल्याने अनेकांची विशेषतः गरीब कुटुंबांची उपासमार सुरू होती. अशा लोकांसाठी अन्नधान्याची कीट मोफत देण्यात आली. याचबरोबर कोरोना रुग्णावर उपचार करण्यासाठी शासनाकडून महात्मा ज्योतिबा फुले जीवनदायी आरोग्य योजनेतून प्रतिरुग्ण ६५ हजार रुपये देण्याची घोषणा आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी केली. ही तरतूद कमी असल्याने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना अधिकृतपणे पत्र लिहून ही तरतूद दीड लाख रुपये करावी, अशी मागणी केली. कोरोना महामारीची झळ समाजातील प्रत्येक घटकाला बसलेली आहे. शेतकरी, वंचित, उपेक्षित घटकांना सर्वतोपरी मदत करण्याचा प्रयत्न केल्याचे खा. डॉ. भागवत कराड यांनी सांगितले.

प्रथम पुण्यस्मरण

कालकथित शांताबाई गोविंद वाहुळे

(मृत्यू दि. १४/१०/२०१९)

"लाभेल का अशी मूर्ती,
आदर्शाची होती कीर्ती ।
पुनर्जन्म घ्यावा आमच्यासाठी,
वाहतो आम्ही सर्व मिळूनी
प्रेमाची व श्रद्धेची पुष्पांजली ।।

- शोकाकुल -

आयु. गोविंद नामदेव वाहुळे (पती)
आयु. उषाबाई मदन वाहुळे (सून-मुलगा)
आयु. अलकाबाई प्रकाश वाहुळे (सून-मुलगा)
आयु. सीमा दीपक वाहुळे (सून-मुलगा)
आयु. साधना रितेश वाहुळे (नातसून-नातू)
आयु. रोशनी विकास उबाळे (नात-नातजावई)
आयु. शीतल स्वप्नील साळवे (नात-नातजावई)
कु. रुपाली, आकाश, रोहित, प्रतीक, चैतन्य (नातवंडे), सिद्धी, श्रावणी (पणती)
व समस्त वाहुळे परिवार,
जयभवानीनगर, औरंगाबाद.

नववे पुण्यस्मरण

कै. केसराबाई शंकरराव कांबळे

(स्वर्गवास १४/१०/२०११)

नाही असा क्षण की, तुमचे स्मरण झाले नाही
नाही असा श्वास की, तुमचा भास झाला नाही
उरली नाही साथ आम्हाला, आठवण येते क्षणाक्षणाला

- आपले नम्र -

सौ. सुमनबाई सुधाकरराव कांबळे (सून)
गं.भा. अनुसयाबाई लक्ष्मणराव कांबळे (सून)
सौ. शोभाबाई पंडितराव कांबळे (सून)
सौ. सोनूबाई ज्ञानेश्वरराव कांबळे (सून)
गं.भा. कौशल्याबाई भीमराव अंभोरे (मुलगी-जावई)
सौ. सरूबाई श्रीपतराव सोनवणे (मुलगी-जावई)
सौ. उषा कैलास कांबळे (नातसून)
सौ. सुनीता गजानन कांबळे (नातसून)
सौ. भाग्यश्री मोहन कांबळे (नातसून)
सौ. शेजल पवन कांबळे (नातसून)

किलबिल परिवार : शुभम, आनंद, भारती, साईनाथ, विशाल, डॉली, करण, साईल, सई, समृद्धी, विजय, साक्षी, तनू, सबुरी, शिवकन्या. सौ. संगीता राजू अहिरे (नात), सौ. ज्योती गणेश अंभोरे (नात), सौ. कल्पना उत्तम पाटोळे (नात), सौ. नीता पंडितराव कांबळे (नात), सौ. कविता अंकुश अंभोरे (नात), *समस्त कांबळे परिवार*, सिद्धार्थनगर, एन-१२, हडको, औरंगाबाद.- मो. 9503670062

प्रथम वर्षश्राद्ध



कै. श्री. आनंदराव नारायणराव अतकरे

मृत्यू : २६/१०/२०१९

परिवारावर आभाळमाया करणारे व वटवृक्षाप्रमाणे सावली देणारे आमचे कै. आनंदराव नारायणराव अतकरे दि. २६/१०/२०१९ रोजी आम्हास कायमचे सोडून देवाघरी निघून गेले...
पण असा एकही क्षण, एकही दिवस त्यांच्या आठवणीशिवाय गेला नाही.
बुधवार, दि. १४/१०/२०२० रोजी त्यांचे
।। प्रथम वर्षश्राद्ध ।।
आयोजित केले आहे.
कोरोनाच्या आजच्या परिस्थितीमुळे कार्यक्रम घरच्या घरी निवासस्थानी करण्यात येणार आहे.

- विनीत -

विजया आनंदराव अतकरे
नितीन आनंदराव अतकरे, प्रताप आनंदराव अतकरे व समस्त अतकरे परिवार
सराफा रोड, औरंगाबाद.
मो. 9422290952/9421301314

चतुर्थ पुण्यस्मरण

डॉ. त्र्यंबकराव संपतराव सुशीर

(स्वर्गवास १४/१०/२०१६)

चंदनापरी देह झिजवला ।
कष्टातूनी वसंत निर्माण केला ।।
चेहरा होता सदा हसतमुख ।
कष्ट करुनी दिले सर्वांना सुख ।।

- शोकाकुल परिवार -

कमलबाई त्र्यंबकराव सुशीर (पत्नी)
संदीप, सचिन, नितीन (मुले)
मुक्ता, अनिता, सरला (सुना)
सारिका विजय शिरसाठ (मुलगी)
पलाश, मोहित, मानसी, गौरी, हर्षिता, खुशी, दिव्या, रुद्र (नातू)
बजरंग चौक, औरंगाबाद

जाहीर प्रगटनास आक्षेप

(अॅड. रणवीरसिंह ल. छाबडा यांनी उदय जयलाल कासलीवाल यांच्यातर्फे दिनांक ३०/०९/२०२० रोजी दैनिक लोकमत हॅलो औरंगाबादमध्ये, मिळकत मौजे जटवाडा, ता.जि. औरंगाबाद येथील गट नं. १५ (जुना सर्व्हे नं. २०४), क्षेत्र ३ हे. ९० आर बाबत दिलेल्या जाहीर प्रगटनास आक्षेप.)

माझे पक्षकार नामे आफताब अहेमद शेख अखलाक अहेमद शेख, रा. दिल्लीगेट, औरंगाबाद यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सदरील आक्षेप घेत आहे, असे की, वर उल्लेखित मिळकतीबाबत जमिनीचे मूळ मालक नामे सुरय्या बेगम अब्दुल रऊफ यांनी माझ्या पक्षकाराच्या हक्कात दुय्यम निबंधक कार्यालय, औरंगाबाद येथे नोंदणीकृत खरेदीखत दिनांक २९/०६/२०११ रोजी करून दिलेले आहे. ज्याचा नोंदणी क्र. ५१०६/२०११ असा आहे. तसेच सुहास भीमराव बोराडे व इतर हे माझ्या पक्षकाराच्या हक्कात अडथळ्ला करीत असल्याकारणाने त्यांच्या विरोधात सदरील मिळकतीबाबत मा. दिवाणी न्यायालय, औरंगाबाद येथे नियमित दिवाणी दावा क्र. ८६२/२०१८ असा दाखल केलेला आहे. तसेच सदरील मिळकतीबाबत मा. सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे स्पेशल लिव्ह पिटिशन (सिव्हिल) क्र. ३५७९/२०२० असे प्रकरण न्यायप्रलंबित आहे. असे की, माझे पक्षकार यांचे खरेदीखत सुहास भीमराव बोराडे यांच्या अगोदरचे आहे व माझे पक्षकार सदरील जमिनीचे मालक व कब्जेदार आहेत. तसेच वादीत फेरफार क्र. १३१२ बाबत मा. विभागीय अधिकारी यांच्याकडे आर.ओ.आर. अपील क्र. २७९/२०१३ न्यायप्रलंबित आहे. तरी सदरील मिळकतीबाबत कोणीही/आपले पक्षकार यांनी कोणतेही व्यवहार विकास करारनामा व इतर दस्त करू नये, असे केल्यास ते बेकायदेशीर राहील व माझे पक्षकार त्यांच्या विरोधात कायदेशीर कार्यवाही करतील, याची नोंद घ्यावी व होणाऱ्या परिणामास व्यवहार करणारे हे सर्वस्वी जबाबदार राहाल.

करिता जाहीर आक्षेप.

दि. १३/१०/२०२०

मार्फत

अॅड. शेख मुकीन बाबामियाँ

कार्यालय- शॉप नं. ३, पहिला मजला, माझ कॉम्प्लेक्स, मक्का मस्जीदजवळ, जुना बाजार रोड, सिटीचौक, औरंगाबाद. मो. ९८८१९५९६५८

डॉक्टरांच्या संपाने रुग्णसेवेला फटका
औरंगाबाद : कोविड भत्ता ...ण्याच्या मागणीसाठी मंगळवारी ...टीतील २०० आंतरवासिता डॉक्टरांनी (इंटर्न) संप पुकारला. परिणामी, रुग्णसेवेला फटका ...सला. आंतरवासिता डॉक्टरांअभावी निवासी डॉक्टर, वरिष्ठ डॉक्टरांना वाढीव रुग्णसेवेची धुरा सांभाळावी लागली.
पान ३

लोकमत
हॅलो औरंगाबाद
औरंगाबाद, बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२०

DECORATE YOUR HOME
CURTAIN CLOTH / CUSHION COVER
WINDOW BLIND / SOFA CLOTH / PVC FLORING
MATTRESES / DOORMAT / BEDSHEET / GALICHA
BLANKET / PILLOW / DOHAR / DUVET / FOAM
SHEETAL furnishings
Beside Air India Office, Jalna Road, Cidco, Aurangabad.Ph. 2486755

दिवा लावण्यासाठी निघालेल्या दोन पणत्या विझल्या...

सुरेश चव्हाण
लोकमत न्यूज नेटवर्क

कन्नड : हिंदू धर्मात अधिक मासाला फार महत्त्व असून, या महिन्यात मनोभावे भगवंताची भक्ती केली, तर कल्याण होते, अशी धारणा आहे. त्यामुळे या महिन्यात ग्रामीण भागातील महिला सकाळी महादेवाच्या मंदिरात जाऊन अगरबत्ती व दिवा लावून मनोभावे पूजा करीत असल्याचे चित्र आहे. अशाच भक्तिभावाने महादेवाच्या मंदिरात दिवा लावण्यासाठी निघालेल्या दोन पणत्या, मात्र मंदिरात जाण्यापूर्वीच विझल्याची घटना खामगावात (ता. कन्नड) घडली. मंगळवारी सकाळीच आरती कवडे, ऋतुजा कवडे यांचा खारी नदीच्या खड्ड्यात पडल्याने बुडून दुर्दैवी मृत्यू झाला.

हेच ते महादेवाचे मंदिर. येथे त्या दोघी दिवा लावण्यासाठी जात होत्या. दुसऱ्या छायाचित्रात याच खड्ड्यातील पाण्याने घेतला दोन बहिणींचा बळी. काठावर त्यांच्या पडलेल्या चपला.

मंगळवारची सकाळ खामगावकरांसाठी अमंगल ठरली. गावातील कैलास व शिवाजी कवडे या दोन भावांचे एकत्र कुटुंब असून, दोघांच्याही संसारवेलीवर प्रत्येकी २ मुले आणि एका मुलीच्या रूपाने तीन-तीन फुले उमलली. कैलास कवडे यांची मुलगी आरती दहावी पास, तर शिवाजी कवडे यांची मुलगी ऋतुजा मनेगावच्या मनूबाई विद्यालयात बारावीत शिकत होती. अधिक मासात दररोज सकाळी गावापासून सुमारे १ कि.मी. अंतरावर खारी नदीवर अंघोळ करून काठावरील महादेव मंदिरात दर्शनास जाण्याचा त्यांचा नित्यक्रम होता. मंगळवारीही सकाळी त्या वहिणी, आजी आणि गावातील तीन महिलांसोबत देवदर्शनासाठी गेल्या. नित्याप्रमाणे त्या अंघोळीसाठी थांबल्या. रस्ते कामासाठी ग्रामपंचायतीच्या परवानगीने मुरमाचा उपसा केल्याने मोठा खड्डा झाला आहे. याच खड्ड्याजवळ धुणे धुण्यासाठी दगड ठेवण्यात आले आहेत. येथेच चपला काढून अंघोळीसाठी आरती व ऋतुजा पाण्यात उतरल्या. आरतीचा पाय घसरल्याने तिला सावरण्यासाठी गेलेली ऋतुजाही पाण्यात बुडाली. दोन्ही नातींना बुडताना पाहून वृद्ध आजींनी त्यांना वाचविण्यासाठी धावाधाव केली. मात्र, ताकद कमी पडली आणि त्याही गटांगळ्या खात असताना मध्यप्रदेशातील मजूर नवलसिंग आर्य व दीपक सोळंकी यांनी त्यांना वाचविले.

मुरमाच्या उपशामुळे खड्डा

01 एक महिन्यापूर्वी याच ठिकाणी गुरे चारण्यासाठी गेलेला गौरव कवडे हा अंघोळीसाठी पाण्यात गेला असता बुडत होता. आजूबाजूच्या लोकांनी त्याचे प्राण वाचवले होते.

02 नदीतील मुरमाचा मोठ्या प्रमाणात उपसा झाल्याने ठिकठिकाणी खोल खड्डे पडलेले आहेत. यामुळे अशा घटना घडतात. त्यामुळे नागिरकांनीसुद्धा अशा ठिकाणी जाणे टाळले पाहिजे. तसेच ग्रामपंचायतीसह जबाबदार प्रशासनानेही याकडे लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दोन्ही बहिणींनी सोबतच घेतला जगाचा निरोप.

निकष धाब्यावर : अनेक ठिकाणी 'ऑन कॉल डॉक्टर'; बिलेही अवाच्या सव्वा

तज्ज्ञ डॉक्टर नसतानाही कोविड रुग्णांवर उपचार

मुजीब देवणीकर
लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : कोविड महामारीत काही खाजगी रुग्णालयांनी रुग्णांची अक्षरशः लूट केली. प्रत्येक ठिकाणी रुग्णांवर उपचार करण्यासाठी किमान एम.डी. मेडिसिन डॉक्टर असायलाच हवा, हा निकष धाब्यावर बसवून मोठ्या प्रमाणात रुग्ण दाखल करून घेण्यात येत आहेत. विशेष बाब म्हणजे रुग्णांच्या बिलात एम.डी. मेडिसिन डॉक्टरने पाच वेळेस तपासणी केल्याचा उल्लेख करून बिले काढली जात आहेत.

महाराष्ट्र शासनाने खाजगी रुग्णालयांना कोविड रुग्णांवर उपचार करण्यासाठी काही निकष ठरवून दिले. त्यानुसार शहरात एकूण ४६ ठिकाणी कोरोना रुग्णांवर उपचार सुरू आहेत. त्यातील ११ केंद्रे ही शासकीय, महापालिकेची आहेत.

'लोकमत'ने मंगळवारी शहरातील काही खाजगी रुग्णालयांचा आढावा घेतला. तेथे रुग्णांवर उपचार केले जात होते. मात्र, तज्ज्ञ डॉक्टर दिसून आले नाहीत. काही ठिकाणी ऑन कॉल एम.डी. मेडिसिन डॉक्टर नियुक्त केले आहेत. तर काही ठिकाणी स्वतः चेस्ट फिजिशियन एम.डी. मेडिसिनची भूमिका बजावत आहेत. महापालिकेने खाजगी रुग्णालयांना कोविड सेंटरची परवानगी देताना निकषांची अंमलबजावणी होते की नाही. हे बारकाईने तपासले नाही. खाजगी रुग्णालयांनी छोट्या जागेमध्ये जास्त बेड टाकून रुग्ण भरती करणे सुरू केले आहे. आय.सी.यू. बेड किती जागेत, किती अंतरावर असावेत, याचे कोणतेही निकष पाळलेले नाहीत. काही खाजगी रुग्णालये एम.डी. मेडिसिन डॉक्टरच्या नावावर बिलात मोठी रक्कम उकळत आहेत. रुग्णांच्या नातेवाईकांनी एम.डी. मेडिसिन डॉक्टर किती वेळेस आला ते सीसीटीव्हीमध्ये दाखवा, अशी मागणी करताच रुग्णालयांनी माघार घेतली. असाच एक प्रकार घाटीजवळच्या एका कोविड सेंटरमध्ये घडला.

फिरोज खान

रिॲलिटी चेक

टीव्ही सेंडर रोडवरील धनवई आणि सिंग रुग्णालयात एम.डी. डॉक्टर उपस्थित होते. (दुसरे छायाचित्र) मुकुंदवाडी येथील सांगवीकर हॉस्पिटलचे. येथे मात्र एम.डी. डॉक्टर नाहीत.

...अशी आहे विदारक अवस्था

सांगवीकर हॉस्पिटल

मुकुंदवाडी येथील सांगवीकर रुग्णालयात अत्यंत छोट्या जागेत आय.सी.यू. उभारले आहे. रुग्णालयाच्या दर्शनी भागात शुल्क आकारणीचा बोर्ड आहे. बोर्डावर जेवढी रक्कम दर्शविण्यात आली आहे. त्यापेक्षा दहा पट जास्त बिल तयार करण्यात येते. विशेष बाब म्हणजे रुग्णालयात एम.डी. मेडिसिन डॉक्टर नाही. रुग्णालय चालक डॉ. पांडुरंग सांगवीकर म्हणतात की, मी स्वतः चेस्ट फिजिशियन आहे. मग एम.डी. मेडिसिन कशासाठी?

निमाई हॉस्पिटल

टीव्ही सेंटर भागातील निमाई हॉस्पिटल येथे तीन बालरोगतज्ज्ञ आहेत. ऑन कॉल पद्धतीवर डॉ. सत्यजित शिराळे यांची नेमणूक केली आहे. जेव्हा गरज असते तेव्हा संबंधित डॉक्टर येतात, असा दावा रुग्णालयाकडून करण्यात आला. १० ऑक्सिजन बेड, ८ आयसीयू बेड आहेत.

धनवई हॉस्पिटल

टीव्ही सेंटर रोडवरील धनवई आणि सिंग या रुग्णालयात मागील काही दिवसांपासून कोविड रुग्णांवर उपचार सुरु आहेत. रुग्णालयात २४ तास एम.डी. मेडिसिन डॉक्टर उपलब्ध आहेत.

न्यू लाईफ बाल रुग्णालय

न्यू लाईफ बाल रुग्णालयात एम.डी. मेडिसिन म्हणून डॉ. दिनेश चांडक काम पाहत आहेत. रुग्णांवर उपचार करताना कोणतीही अडचण नाही. महापालिकेने डी.सी.एच.सी. म्हणून आम्हाला परवानगी दिल्याचे डॉ. पांडुरंग नखाते यांनी सांगितले.

रुग्णांवर उपचार महत्त्वाचे

प्रत्येक रुग्णालयात २४ तास एमडी मेडिसिन असणे आवश्यक नाही. ऑन कॉल पद्धतीवर डॉक्टर बोलावले तरी काही हरकत नाही. महामारीत रुग्णांवर उपचार आवश्यक आहेत. ज्याठिकाणी एमडी मेडिसिन डॉक्टर उपलब्ध नाही आणि त्यांनी रुग्णांची तपासणी केलेली नसताना त्यांच्या बिलात एम.डी. मेडिसिनच्या नावावर पैसे उकळण्यात येत असतील, तर रुग्णांच्या नातेवाईकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार करावी. प्रत्येक रुग्णालयातील बिलांच्या तपासणीसाठी स्वतंत्र लेखापरीक्षक नेमण्यात आले आहेत.

-डॉ. नीता पाडळकर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मनपा

चिकलठाणा औद्योगिक वसाहतीला पाणीपुरवठा करणारी जलवाहिनी बुधवारी बायपासलगत फुटून पाण्याचे असे उंचच उंच कारंजे उडत होते.

'एमआयडीसी'ची जलवाहिनी फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया

बीड बायपास चिंब : ४० वर्षे जुनी जलवाहिनी फुटणे हे नित्याचेच

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : चिकलठाणा औद्योगिक वसाहतीला पाणीपुरवठा करणारी 'एमआयडीसी'ची पाईपलाईन फुटल्यामुळे बीड बायपास रोडवरील कमलनयन बजाज हॉस्पिटलसमोर दिवसभरात लाखो लिटर पाणी वाया गेले.

दरम्यान, 'एमआयडीसी'च्या यंत्रणेने युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम हाती घेऊन सात तासांत पाणीपुरवठा सुरू केला. ही पाईपलाईन फुटण्याची ही पहिलीच घटना नसून, यापूर्वीही सातत्याने ती फुटून लाखो लिटर पाणी वाया गेलेले आहे. ७०० मि.मी. व्यासाची ही पाईपलाईन ४० वर्षांची असून, ती आता कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहे. नवीन पाईप टाकण्यासाठी 'एमआयडीसी'ने शासनाकडे अंदाजपत्रक सादर केले असून, अद्याप त्यासाठी मंजुरी मिळालेली नाही, असे 'एमआयडीसी'चे उपअभियंता परळीकर यांनी सांगितले.

बीड बायपास रोडलगत जेथून ही पाईपलाईन गेली आहे. त्यावर मालवाहतूक करणारी अवजड वाहने उभी राहत असल्यामुळे पाईपलाईनला सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास तडा गेला. त्यामुळे २५ ते ३० फूट उंच पाण्याचे फवारे उडत होते.

ही माहिती मिळाल्यानंतर 'एमआयडीसी'च्या यंत्रणेने वाळूज जलशुद्धीकरण येथून होणारा पाणीपुरवठा तात्काळ बंद केला. तडा गेलेल्या ठिकाणी वेल्डिंग करण्यासाठी पाईपलाईनमधील संपूर्ण पाणी दुपारी २ ते ३ वाजेपर्यंत खाली करण्यात आले. त्यानंतर दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले. सायंकाळी हे काम पूर्ण झाल्यानंतर त्यातून पुन्हा पाणीपुरवठा सुरू करण्यात आला.

'मंदिर बंद, उघडले बार, उद्धवा धुंद तुझे सरकार'

घोषणाबाजी : मंदिरे उघडण्यासाठी भाजपचे लाक्षणिक उपोषण

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : 'मंदिर बंद, उघडले बार, उद्धवा धुंद तुझे सरकार', अशी आली असून, मंदिरे उघडण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

सकाळी ११ ते दुपारी २ खा. डॉ. भागवत कराड, आ. अतुल सावे, प्रवीण घुगे, संजय केणेकर, भाऊसाहेब देशमुख, बापू घडामोडे,

पैशाच्या वादातून हॉटेल चालकाचे केले अपहरण

औरंगाबाद : आर्थिक देवाणघेवाणीतून झालेल्या वादानंतर हॉटेल व्यावसायिकाचे अपहरण करण्यात आल्याची घटना रजिस्ट्री कार्यालय परिसरात मंगळवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी सिटीचौक पोलीस